पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी - ४११ ०१८ नगरसचिव कार्यालय,
क्रमांक - नस/०३/कावि/६४१/२०१७
दिनांक – ०३/०३/२०१७

प्रति,

मा……………………………………,
सदस्य, स्थायी समिती,
पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी - ४११ ०१८.

विषय - पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.स्थायी समितीची साप्ताहिक सभा दिनांक - ०७/०३/२०१७ रोजी आयोजित केले बाबत….

महोदय/महोदया,

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.स्थायी समितीची साप्ताहिक सभा मंगळवार, दिनांक ०७/०३/२०१७ रोजी दुपारी ०२.३० वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली आहे. सोबत सभेची कार्यपत्रिका जोडली आहे. सभेस आपण उपस्थित रहावे, ही विनंती.

आपला विश्वासू,

**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी - ४११ ०१८.

प्रत - १) सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी
२) कार्यालयीन नोटीस बोर्ड

पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी-४११ ०१८.

मा.स्थायी समिती

**कार्यपत्रिका क्रमांक – २६८**

दिनांक - ०७/०३/२०१७ वेळ – दुपारी ०२.३० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.स्थायी समितीची साप्ताहिक सभा मंगळवार, दिनांक ०७/०३/२०१७ रोजी दुपारी ०२.३० वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली आहे. सभेत खालील कामकाज होईल.

----------

विषय क्र.१) पिंपरी चिंचवड महानगपालिकेच्या सन २०१६-१७ चे अंदाजपत्रकामधील प्रस्तावात नमूद केले प्रमाणे तरतूद वर्ग करणेस मान्यता देणेबाबत विचार करणे.
(वाढ/घट र.रू.२०,००,०००/-)
(दिनांक ०७/०३/२०१७ च्या सभेत घेणेच्या निर्णयाप्रमाणे)

विषय क्र.२) स्थापत्य उद्यान विभागाकडील सन २०१६-१७ च्या अंदाजपत्रकातील कामाच्या तरतूदी मध्ये अंदाजपत्रक तयार करणेसाठी प्रस्तावात नमूद प्रमाणे फेरबदल करणेस मान्यता देणेबाबत विचार करणे.
(वाढ/घट र.रू.५०,००,०००/-)
(दिनांक ०७/०३/२०१७ च्या सभेत घेणेच्या निर्णयाप्रमाणे)

विषय क्र.३) पिंपरी चिंचवड महानगरपालिका विविध विभागामार्फत निविदा प्रसिध्द केल्या जातात. निविदा संचाची किंमती/दर याबाबत महाराष्ट्र शासन, उद्योग उर्जा व कामगार विभाग शासन निर्णय क्र. भांखस-२०१४/प्र.क्र.८२/भाग-III/उद्योग-४ दि.३० ऑक्टोबर २०१५ चे परिपत्रकातील ६.८ परिशिष्ठ ८ नुसार निविदेची किंमत/शुल्क वाढ केली आहे. त्यानुसार भांडार विभागाने सर्व विभागांची एकाच प्रकारचे निविदा संच दराबाबत मा.स्थायी समिती ठराव क्र.१५८५७ दि.२९.३.२०१६ अन्वये मान्यता घेऊन इकडील विभागाचे आदेश क्र. मभा/१/कावि/२९/२०१६ दि.१२.४.२०१६ अन्वये दरवाढ लागू करण्यात आलेली होती ती खालील प्रमाणे.

प्रपत्र 'क'

| अ.क्र | तपशिल (कामाची एकूण रक्कम) | दि.३०.१०.२०१५ चे शासन निर्णयानुसार दर | दि.१७.१०.१३ चे आदेशाप्रमाणे यापुर्वीचे निविदा संच दर | दि.१२.४.१६ आदेशाप्रमाणे निविदा संच विक्री दर | दि.१२.४.१६ आदेशाप्रमाणे प्रस्तावित वार्षिक दरवाढ |
|---|---|---|---|---|---|
| 1 | र.रु. ५० हजाराचे आतील कामासाठी | -- | २००/- | ५००/- | -- |
| 2 | र.रु. ५० हजार ते १ लाखापर्यंत | -- | ३००/- | ७००/- | -- |
| 3 | र.रु. १ लाख ते २ लाखापर्यंत | -- | ५००/- | १०००/- | -- |
| 4 | र.रु. २ लाख ते ५ लाखापर्यंत | १०००/-Yearly increase 100/- | ७५०/- | १५००/- | १००/- |
| 5 | र.रु. ५ लाख ते १० लाखापर्यंत | २०००/- Yearly increase 200/- | १,०००/- | २,०००/- | २००/- |
| 6 | र.रु. १० लाख ते ५० लाखपर्यंत | ३०००/- Yearly increase 300/- | १,५००/- | ३,०००/- | ३००/- |
| 7 | र.रु. ५० लाख ते १ कोटीपर्यंत | १०,०००/- Yearly increase 1000/- | २,०००/- | १०,०००/- | १०००/- |
| 8 | र.रु. १ कोटी ते २ कोटी | Respective Department to fix form fee | ३,०००/- | १३,०००/- | २०००/- |
| 9 | र.रु. २ कोटी ते ५ कोटी | Respective Department to fix form fee | १०,०००/- | १५,०००/- | २०००/- |
| 10 | र.रु. १० कोटी ते ५० कोटी | Respective Department to fix form fee | १५,०००/- | २०,०००/- | २०००/- |
| 11 | र.रु. १० कोटी ते ५० कोटी | Respective Department to fix form fee | २५,०००/- | ३०,०००/- | २०००/- |
| 12 | र.रु. ५० कोटी पेक्षा जास्त | Respective Department to fix form fee | ५०,०००/- | ५५,०००/- | २०००/- |

वरील प्रमाणे मान्य झालेल्या ठरावाला मा.स्थायी समिति ठराव क्र.१६२५६ दि.१७.५.२०१६ अन्वये "शासन निर्णय दि.३० ऑक्टोबर २०१५ नुसार वरील ठराव भांडार विभागामार्फत साहित्य खरेदीसाठी असून तो विकास कामाच्या निविदांना लागू न करता विकास कामाच्या निविदांना फॉर्म फी ही पुर्वीच्याच दरानेलागु करणेस

मान्यता देणेत येत आहे" असा मा.सदस्य पारीत ठराव संमत झालेला आहे. मा.स्थायी समिती ठराव क्र.१५८१७ दि.२९.३.२०१६ प्रमाणे तसेच इकडील विभागाचे आदेश क्र.मभा/१/कावि/२९/२०१६ दि. १२.४.२०१६ निर्गत करणेत आलेले आहे. आदेश निर्गत केलेनंतर वरील ठरावामध्ये दुरुस्ती करणेसाठी मा.सदस्य ठराव झालेला आहे. मा.सदस्य ठराव क्र. १६२५६ दि. ११.५.२०१६ प्रमाणे जर अंमलबजावणी करावयाची असल्याने त्यास मा.मुलेप विभागामार्फत दिलेल्या अभिप्रायाप्रमाणे पुन्हा मा.स्थायी समितीची मंजुरी घ्यावी लागेल आदेश क्र.मभा/१/कावि/२९/२०१६ दि. १२.४.२०१६ हा आदेश रद्द करून नव्याने आदेश निर्गत करणे आवश्यक आहे.

प्रपत्र ' ब' ( विकास कामासाठी)

| अ.क्र | तपशिल (कामाची एकूण रक्कम) | दि.१७.१०.१३ चे आदेशा प्रमाणे निविदा संच विक्री दर | प्रस्तावित वार्षिक दरवाढ (प्रती वर्षी १०% प्रमाणे) दि.१.४.२०१७ पासुन लागु | सन २०१६-१७ करिता दरवाढ |
|---|---|---|---|---|
| १ | र.रु. ५० हजाराचे आतील कामासाठी | २००/- | -- | -- |
| २ | र.रु. ५० हजार ते १ लाखापर्यंत | ३००/- | -- | -- |
| ३ | र.रु. १ लाख ते २ लाखापर्यंत | ५००/- | -- | -- |
| ४ | र.रु. २ लाख ते ५ लाखापर्यंत | ७५०/- | Yearly increase 10% | १००/- |
| ५ | र.रु. ५ लाख ते १० लाखापर्यंत | १,०००/- | Yearly increase 10% | १००/- |
| ६ | र.रु. १० लाख ते ५० लाखपर्यंत | १,५००/- | Yearly increase 10% | १००/- |
| ७ | र.रु. ५० लाख ते १ कोटीपर्यंत | २,०००/- | Yearly increase 10% | १००/- |
| ८ | र.रु. १ कोटी ते २ कोटी | ३,०००/- | Yearly increase 10% | १००/- |
| ९ | र.रु. २ कोटी ते ५ कोटी | १०,०००/- | Yearly increase 10% | १००/- |
| १० | र.रु. ५ कोटी ते १० कोटी | १५,०००/- | Yearly increase 10% | १००/- |
| ११ | र.रु. १० कोटी ते ५० कोटी | २५,०००/- | Yearly increase 10% | १००/- |
| १२ | र.रु. ५० कोटी पेक्षा जास्त | ५०,०००/- | Yearly increase 10% | १००/- |

प्रपत्र ‘ड’ (सर्व विभांगाची साहित्य खरेदी )

| अ.क्र | तपशिल (कामाची एकूण रक्कम) | दि.३०.१०.२०१५ चे शासन निर्णयानुसार दर | दि.१७.१०.१३ चे आदेशाप्रमाणे यापुर्वीचे निविदा संच दर | प्रस्तावीत करावयाचे निविदा संच दर | प्रस्तावित वार्षिक दरवाढ |
|---|---|---|---|---|---|
| १ | र.रु. ५० हजाराचे आतील कामासाठी | -- | २००/- | ५००/- | -- |
| २ | र.रु. ५० हजार ते १ लाखापर्यंत | -- | ३००/- | ७००/- | -- |
| ३ | र.रु. १ लाख ते २ लाखापर्यंत | -- | ५००/- | १०००/- | -- |
| ४ | र.रु. २ लाख ते ५ लाखापर्यंत | १०००/- Yearly increase 100/- | ७५०/- | १५००/- | १००/- |
| ५ | र.रु. ५ लाख ते १० लाखापर्यंत | २०००/- Yearly increase 200/- | १,०००/- | २,०००/- | २००/- |
| ६ | र.रु. १० लाख ते ५० लाखपर्यंत | ३०००/- Yearly increase 300/- | १,५००/- | ३,०००/- | ३००/- |
| ७ | र.रु. ५० लाख ते १ कोटीपर्यंत | १०,०००/- Yearly increase 1000/- | २,०००/- | १०,०००/- | १०००/- |
| ८ | र.रु. १ कोटी ते २ कोटी | Respective Department to fix form fee | ३,०००/- | १३,०००/- | २०००/- |
| ९ | र.रु. २ कोटी ते ५ कोटी | Respective Department to fix form fee | १०,०००/- | १५,०००/- | २०००/- |
| १० | र.रु. ५ कोटी ते १० कोटी | Respective Department to fix form fee | १५,०००/- | २०,०००/- | २०००/- |
| ११ | र.रु. १० कोटी ते ५० कोटी | Respective Department to fix form fee | २५,०००/- | ३०,०००/- | २०००/- |
| १२ | र.रु. ५० कोटी पेक्षा जास्त | Respective Department to fix form fee | ५०,०००/- | ५५,०००/- | २०००/- |

वरीलप्रमाणे को-या निविदा संच विक्री व वार्षिक दरवाढ प्रपत्र ‘ब’ (विकास कामासाठी) व प्रपत्र ‘ड’ (सर्व विभांगाची साहित्य खरेदी) प्रमाणे करणेत आलेली असल्याने सदर दरवाढीस मान्यता देणेबाबत विचार करणे.

(दिनांक ०७/०३/२०१७ च्या सभेत घेणेच्या निर्णयाप्रमाणे)

विषय क्र.४) पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या “ड” क्षेत्रीय कार्यालयातील म.न.पा.चे TATA ACE वाहनामार्फत घरोघरचा कचरा गोळा करणे व संकलन केंद्र येथे वाहुन नेणेचे कामासाठी उपलब्ध वाहनांवर ४७ वाहन चालक, ३ सुपरवायझर व ९४ कामगार पुरविणेकामी ई-निविदा नोटीस क्र.५/२०१४-१५ प्रसिध्द करुन १ वर्ष कालावधीकरीता निविदा मागविणेत आल्या होत्या. सदरची निविदा किमान वेतन दराच्या असुन यामध्ये अंदाजपत्रक तयार करताना कामगारांचे वेतन व भत्ते यापोटी देय असणारी रक्कम ९०% असुन निविदाधारकांना सेवाशुल्क म्हणून १०% असे रकमेचे विभाजन करणेत आले होते. यामध्ये कामगारांचे वेतन व भत्ते र.रु.१,६९,४६,६१२/-+ सेवाशुल्क र.रु.१६,९४,६६१/- अशी एकूण र.रु.१,८६,४१,२७३/- एवढी निविदेची अंदाजपत्रकीय किंमत आहे. निविदेसाठी सेवाशुल्क रकमेवर पात्रता हा निकष ठेवणेत आला होता. त्यानुसार मे.सावित्री महिला स्वयंरोजगार सेवा सहकारी संस्था मर्यादित यांनी सेवाशुल्काच्या ८१.५०% कमी दराने (र.रु. ३,१३,५१०/-) व एकूण निविदा रकमेच्या ७.४१% कमी दराने निविदा सादर केली होती. सदरचे दर लघुत्तम असल्याने त्यांची पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या “ड” क्षेत्रीय कार्यालयातील म.न.पा. चे TATA ACE वाहनामार्फत घरोघरचा कचरा गोळा करणे व संकलन केंद्र येथे वाहुन नेणे या कामासाठी निविदेमध्ये नमूद केलेप्रमाणे कामगार उपलब्ध करणे तसेच अन्य वाहनांसाठी ७ वाहन चालक पुरविणेकामी दिनांक २३/०७/२०१६ अखेर ठेकेदार म्हणून नेमणूक करणेत आली होती. तदनंतर दि.२४/७/२०१६ ते दि.३१/१२/२०१६ पर्यंत मुदतवाढ देणेसमा. स्थायी समिती ठराव क्रं.१७१०५ दिनांक ६/९/२०१६ अन्वये मान्यता मिळाली आहे. सदर कामाची मुदत दि.२/१/२०१७ अखेर संपुष्टात येणार आहे. सध्या संस्थेमार्फत ५६ वाहनचालक, ६ सुपरवायजर व ९४ कामगार उपलब्ध करुन कामकाज सुरु आहे. याकामाची नविन निविदा कार्यवाही सुरु करणेत आली आहे. त्यास काही महिने कालावधी लागणार आहे. त्यामुळे मे. सावित्री महिला स्वंयरोजगार सेवा सह. संस्था मर्या. यांची ठेकेदार म्हणून दिनांक ३/१/२०१७ ते दिनांक ३०/०४/२०१७ अखेर अथवा नविन निविदा कार्यवाही पुर्ण होईपर्यंत या पैकी जे प्रथम पुर्ण होईल त्या कालावधीपर्यंत नेमणूक करणेसमुदतवाढ देणे व याकामी येणा-या अंदाजे र.रु.७०,७७,४००/- (अक्षरी र.रु.सत्तर लाख सत्याहत्तर हजार चारशे फक्त) अथवा प्रत्यक्ष येणा-या खर्चास मान्यता देणेबाबत विचार करणे.

(दिनांक ०७/०३/२०१७ च्या सभेत घेणेच्या निर्णयाप्रमाणे)

विषय क्र.५) पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या उद्यान विभागामार्फत सन २०१६-१७ चे अंदाजपत्रकामध्ये विविध लेखाशिर्षावर खालील प्रमाणे तरतुद करणेत आलेली आहे. खेळणी दुरुस्ती, उद्यान देखभाल व विकास कामे ठेकेदारी पध्दतीने करणे व उद्यान विषयक विविध कामे करणे या लेखाशिर्षावरील तरतुद अपुरी पडत असलेने सदर लेखाशिर्षावर प्रस्तावात नमूद प्रमाणे तरतूद वर्ग करणेस मान्यता देणेबाबत विचार करणे. (वाढ/घट र.रू.१,१०,००,०००/-)

(दिनांक ०७/०३/२०१७ च्या सभेत घेणेच्या निर्णयाप्रमाणे)

विषय क्र.६) पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे वृक्षसंवर्धन विभागाचे सन २०१६–१७ अंदाजपत्रकामध्ये खडडे खोदाई/भराई करणे या लेखाशिर्षावर र.रू.८०,००,०००/- तरतुद करणेत आलेली आहे. खडडे खोदाई/भराई करणे या लेखाशिर्षावर र.रू.२०,००,०००/- इतक्या जास्त रकमेची आवश्यकता आहे. तथापी तार कुपंण देखभाल दुरूस्ती या लेखाशिर्षामधून र.रू.२०,००,०००/- खडडे खोदाई/भराई करणे या लेखाशिर्षावर वर्ग करणेस मान्यता देणेबाबत विचार करणे.

(दिनांक ०७/०३/२०१७ च्या सभेत घेणेच्या निर्णयाप्रमाणे)

विषय क्र.७) पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे आरोग्य विभागास आवश्यक ४.५ घन मिटर क्षमता बीन्स कंटेनर म.न.पा.ड्रॉईंग/डिझाईन/स्पेशिफिकेशन/नमुन्या प्रमाणे खरेदी कामी ऑनलाईन ई.निविदा सुचना क्र.१३/२०१६-१७ अन्वये प्रसिध्द करून ऑनलाईन निविदा दर मागविणेत आले होते. त्यानुसार ऑनलाईन पाच निविदा दरपत्रके प्राप्त झाली आहेत. प्राप्त दरपत्रकामध्ये मे.स्मितल इंजिनिअरींग वर्क्स, पुणे यांचे ४.५ घनमिटर क्षमता बीन्स कंटेनर एकूण-७५ नग (बाब क्र.१) साहित्यासाठी र.रु.३६,२४,७५०/- लघुत्तम दर प्राप्त झाले आहेत. मनपाचे आरोग्य विभागाकरीता ४.५ घनमिटर क्षमता बीन्स कंटेनर खरेदी करणे आवश्यक आहेत. सदरचा खर्च हा अंदाजपत्रकीय रक्कमेपेक्षा २४.४८% ने कमी असल्याने सदरचे खर्चास मान्यता देणेबाबत विचार करणे.

(दिनांक ०७/०३/२०१७ च्या सभेत घेणेच्या निर्णयाप्रमाणे)

विषय क्र.८) मनपाचे आरोग्य विभागास सायफेनोथ्रीन ५% EC खरेदीकामी ई-नि.सु.क्र.३९/२०१६-१७ अन्वये ऑनलाईन निविदा दर मागविणेत आलेले होते. त्यामध्ये प्राप्त तीन निविदाकारा पैकी मे. रमेश अग्रोकेम कॉर्पो. यांचे सायफेनोथ्रीन ५% EC चे लघुत्तम दर र.रू.११४०/- प्र.लि. प्राप्त झालेले आहेत. प्राप्त लघुत्तम दराने आरोग्य विभागास ४५० लि. सायफेनोथ्रीन ५% EC खरेदीकामी एकूण र.रू.५,१३,०००/- इतका खर्च येणार आहे. प्राप्त लघुत्तम दर हे मनपा अंदाजपत्रकीय दर एकूण र.रू.५,१७,५००/- पेक्षा ०.८६% ने कमी आहेत. सदर दर स्विकृत करणेस मान्यता दिलेली असून त्यांचेबरोबर करारनामा करून पुरवठा आदेश निर्गत करणेस मान्यता देणेबाबत विचार करणे.

(दिनांक ०७/०३/२०१७ च्या सभेत घेणेच्या निर्णयाप्रमाणे)

विषय क्र.९) मनपाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.६३/१६/२०१६-१७ अन्वये दापोडी प्रभाग क्र.६१ रस्त्याच्या कडेने नवीन ८० मी.मी. रबर मोल्डेड पेव्हींग ब्लॉक बसविणेकामी मे.सिध्दीविनायक एन्टरप्रायझेस नि.र.रू.35,01,401/- (अक्षरी रक्कम रुपये पस्तीस लाख एक हजार चारशे एक फक्त) पेक्षा 22.99% कमी या ठेकेदाराकडुन निविदा मंजूर दराने र.रू.28,31,250/- पर्यंत काम करून घेणेस तसेच नियमानुसार व निविदेतील निविदा अटीप्रमाणे भाववाढ कलमानुसार मटेरियलच्या निर्धारीत केलेल्या बेसीक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम

अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहुन त्यांचेबरोबर करारनामा करुन घेणेस मान्यता देणेबाबत विचार करणे.

(दिनांक ०७/०३/२०१७ च्या सभेत घेणेच्या निर्णयाप्रमाणे)

विषय क्र.१०) मनपा उदयान विभागाकडील कोटेशन नोटीस क्र.19/2016-17 करीता मनपाचे दुर्गादेवी उदयान येथे एफ.आर.पी. टॉयलेट ब्लॉक पूरविणे व बसविणेकामी मे. अव्वल फायबर ग्लास कोटेशन नोटीस र.रू.1,98,000/- (अक्षरी.र.रू.एक लाख अठ्ठ्याण्णव हजार फक्त) पेक्षा -34% ने कमी कोटेशन स्वीकृत करणेत आले असून आदेश, उदयान/4/कावि/09/2017 दि.09/01/2017 अन्वये कामाचा आदेश देणेत आला असल्याने त्याचे अवलोकन करणे.

(दिनांक ०७/०३/२०१७ च्या सभेत घेणेच्या निर्णयाप्रमाणे)

विषय क्र.११) मनपा उदयान विभागाकडील कोटेशन नोटीस क्र.14/2016-17 करीता मनपाचे दुर्गादेवी उदयान येथे एफ.आर.पी. टॉयलेट ब्लॉक पूरविणे व बसविणेकामी मे.अव्वल फायबर ग्लास कोटेशन नोटीस र.रू.1,98,000/- (अक्षरी र.रू.एक लाख अठ्ठ्याण्णव हजार फक्त) पेक्षा -34% ने कमी कोटेशन स्वीकृत करणेत आले असून आदेश उदयान/4/कावि/10/2017 दि.09/01/2017 अन्वये कामाचा आदेश देणेत आला असल्याने त्याचे अवलोकन करणे.

(दिनांक ०७/०३/२०१७ च्या सभेत घेणेच्या निर्णयाप्रमाणे)

विषय क्र.१२) पिंपरी चिंचवड महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक फेब्रुवारी २०१७ मध्ये होणार आहे. मा.राज्य निवडणूक आयोगाने दि.८ डिसेंबर २०१६ चे पत्रान्वये मनपा हद्दीतील मतदारांची मतदानाबाबत मोठ्या प्रमाणावर जनजागृती व्हावी यासाठी महापालिकेने सर्व प्रसार/प्रसिध्दी यंत्रणांचा अवलंब करून जनजागृती करणेबाबत कळविले आहे. तदनुसार महापालिकेने शहरामध्ये व गस्तीच्या ठिकाणी तसेच झोपडपट्टीमध्ये पथनाट्ये सादर करणे, फ्लेक्स व होर्डींग लावणे, महिला बचत गटांद्वारे मतदार जनजागृती करणे, महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या वक्तृत्व स्पर्धा घेणे, कामगारांचे मेळावे घेणे, ज्येष्ठ नागरिक संघ व घरकुल वासियांचे मेळावे घेणे, शहरातील गॅस वितरकाद्वारे मतदान करणेबाबतचे स्टिकर्स वितरीत करणे, मॅरेथॉन स्पर्धा व सायकल रॅली स्पर्धा आयोजित करणे, रिक्षास स्टिकर्स लावणे, रेडिओ मिर्ची, वृत्तपत्रे, सोशल मिडीया, ऑडीओ व्हिडीओ क्लिप यांच्यामार्फत प्रचार करणे इ. उपक्रम राबवून जनजागृती करणेबाबत मोठ्या प्रमाणावर कार्यक्रमाचे आयोजन केले आहे. सदर कार्यक्रमांच्या अनुषंगाने तातडीच्या होणा-या खर्चासाठी अंदाजे र.रु. ८१,३६,५००/- (अक्षरी र.रू.एक्क्याऐंशी लाख छत्तीस हजार पाचशे फक्त) चे खर्चास मान्यता देणेबाबत विचार करणे.

(दिनांक ०७/०३/२०१७ च्या सभेत घेणेच्या निर्णयाप्रमाणे)

विषय क्र.१३) मनपाच्या ड क्षेत्रिय कार्यालय स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.५/८०-२०१६-१७ अन्वये प्रभाग क्र.५६ वैदुवस्ती मधील मुख्य व अंतर्गत रस्त्याच्या कडेच्या पेव्हींग ब्लॉकची दुरुस्तीची कामे करणे व इतर स्थापत्य विषयक कामे करणेकामी मे.श्री सदगुरुकृपा कन्स्ट्रक्शन नि.र.रु.७,००,१६४/- (अक्षरी र.रु.सात लाख एकशे चौसष्ट फक्त) पेक्षा २२.००% कमी या ठेकेदारांकडून निविदा मंजूर दराने र.रु.५,४६,१२८/- पर्यंत काम करुन घेणेस तसेच नियमानुसार व निविदेतील निविदा अटी प्रमाणे भाववाढ कलमानुसार मटेरियलच्या निर्धारित केलेल्या बेसीक दरामध्ये कंत्राट कलावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील. या अटीस अधिन राहून त्यांचेबरोबर करारनामा करुन घेणेत आला असल्याने त्याचे अवलोकन करणे.

विषय क्र.१४) मनपाच्या ड क्षेत्रिय कार्यालय स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.५/२८-२०१६-१७ अन्वये प्रभाग क्र.५७ पिंपळे गुरव परिसरातील राडारोडा उचलणेची कामे करणेकामी मे. श्री सदगुरुकृपा कन्स्ट्रक्शन नि.र.रु.६,१६,२४६/- (अक्षरी र.रू.सहा लाख सोळा हजार दोनशे सोळा फक्त) पेक्षा १८.००% कमी या ठेकेदारांकडून निविदा मंजूर दराने र.रु.५,०५,३२२/- पर्यंत काम करुन घेणेस तसेच नियमानुसार व निविदेतील निविदा अटी प्रमाणे भाववाढ कलमानुसार मटेरियलच्या निर्धारित केलेल्या बेसीक दरामध्ये कंत्राट कलावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील. या अटीस अधिन राहून त्यांचेबरोबर करारनामा करुन घेणेत आला असल्याने त्याचे अवलोकन करणे.

विषय क्र.१५) मनपाच्या ड क्षेत्रिय कार्यालय स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.५/७२-२०१६-१७ अन्वये प्रभाग क्र.४४ अशोक थिएटर पिंपरी येथे विविध अंतर्गत गल्यांमध्ये पेव्हींग, ब्लॉक दुरुस्ती व देखभालीची कामे करणेकामी मे. बालाजी कन्स्ट्रक्शन नि.र.रु.८,३८,९२०/- (अक्षरी र.रु.आठ लाख अडोतीस हजार नऊशे वीस फक्त) पेक्षा २०.००% कमी या ठेकेदारांकडून निविदा मंजूर दराने र.रु.६,७१,१३६/- पर्यंत काम करुन घेणेस तसेच नियमानुसार व निविदेतील निविदा अटी प्रमाणे भाववाढ कलमानुसार मटेरियलच्या निर्धारित केलेल्या बेसीक दरामध्ये कंत्राट कलावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील. या अटीस अधिन राहून त्यांचेबरोबर करारनामा करुन घेणेत आला असल्याने त्याचे अवलोकन करणे.

विषय क्र.१६) मनपाच्या ड क्षेत्रिय कार्यालय स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र. ६/२-२०१६-१७ अन्वये सन २०१६-१७ करीता श्रीनगर व रहाटणी परिसरात टँकर द्वारे पाणी पुरवठा करणेकामी मे. भैरवनाथ सप्लायर्स नि.र.रु.४,२१,०१७/- (अक्षरी र.रु.चार लाख एकवीस हजार सतरा फक्त) पेक्षा ०२.००% कमी या ठेकेदारांकडून निविदा मंजूर दराने

र.रु.४,१२,५९७/- पर्यंत काम करुन घेणेस तसेच नियमानुसार व निविदेतील निविदा अटी प्रमाणे भाववाढ कलमानुसार मटेरियलच्या निर्धारित केलेल्या बेसीक दरामध्ये कंत्राट कलावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील. या अटीस अधिन राहून त्यांचेबरोबर करारनामा करुन घेणेत आला असल्याने त्याचे अवलोकन करणे.

विषय क्र.१७) मनपाच्या ड क्षेत्रिय कार्यालय स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.६/४-२०१६-१७ अन्वये सन २०१६-१७ करीता विजयनगर परिसरात पाणी पुरवठा विषयक किरकोळ दुरुस्ती कामे करणेकामी मे. श्री कॉन्ट्रॅक्टर नि.र.रु.७,००,७१७/- (अक्षरी र.रु.सात लाख सातशे सतरा फक्त) पेक्षा ३३.३३% कमी या ठेकेदारांकडून निविदा मंजूर दराने र.रु.४,६७,१६८/- पर्यंत काम करुन घेणेस तसेच नियमानुसार व निविदेतील निविदा अटी प्रमाणे भाववाढ कलमानुसार मटेरियलच्या निर्धारित केलेल्या बेसीक दरामध्ये कंत्राट कलावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील. या अटीस अधिन राहून त्यांचेबरोबर करारनामा करुन घेणेत आला असल्याने त्याचे अवलोकन करणे.

विषय क्र.१८) मनपाच्या ड क्षेत्रिय कार्यालय स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.६/९-२०१६-१७ अन्वये ड प्रभाग अंतर्गत वाकड उपविभागातील प्रभाग क्र.४८, ५४ ते ५७ हायमास्टचे दुरुस्तीची कामे करणेकामी मे. पी एम के इलेक्ट्रीकल्स नि.र.रु.२,९६,५३५/- (अक्षरी र.रु.दोन लाख शाहन्नव हजार पाचशे पस्तीस फक्त) पेक्षा १६.००% कमी या ठेकेदारांकडून निविदा मंजूर दराने र.रु.२,४९,०८९/- पर्यंत काम करुन घेणेस तसेच नियमानुसार व निविदेतील निविदा अटी प्रमाणे भाववाढ कलमानुसार मटेरियलच्या निर्धारित केलेल्या बेसीक दरामध्ये कंत्राट कलावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील. या अटीस अधिन राहून त्यांचेबरोबर करारनामा करुन घेणेत आला असल्याने त्याचे अवलोकन करणे.

विषय क्र.१९) पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या सुरक्षा व विविध क्षेत्रीय कार्यालयासाठी आवश्यक 6x9 फुटाचे 50 नग व 2x3 फुटाचे 25 नग वटीव राष्ट्रध्वज खरेदी करणे आवश्यक आहे. याकामी पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या सुरक्षा व विविध क्षेत्रीय कार्यालयासाठी आवश्यक 6x9 फुटाचे 50 नग व 2x3 फुटाचे 25 नग वटीव राष्ट्रध्वज दोरी गुटकासहीत निविदा न मागविता, करारनामा न करता थेट पध्दतीने मुंबई खादी अण्ड व्हिलेज इंडस्ट्रिज असोसिएशन, मुंबई यांचेकडून खरेदी करणेकामी येणा-या र.रु.3,14,625/- अधिक पॅकींग या करासह येणा-या प्रत्यक्ष खर्चास तसेच, सदरची रक्कम मुंबई खादी अण्ड व्हिलेज इंडस्ट्रीज असोसिएशन, मुंबई यांना आगाऊ रक्कम अदा करणेस मा.आयुक्त सो. यांनी मान्यता दिलेली आहे. त्याप्रमाणे, मुंबई खादी आणि व्हिलेज इंडस्ट्रिज असोसिएशन, मुंबई यांचेकडून

र.रु.3,14,625/- अधिक पॅकींग या करासह खरेदी करणेत आलेली असल्याने तसेच सदरची रक्कम मुंबई खादी आणि व्हिलेज इंडस्ट्रिज असोसिएशन यांना आगाऊ रक्कम अदा केली असल्याने त्यास कार्योत्तर मान्यता देणेबाबत विचार करणे.

विषय क्र.२०) मनपाच्या ब क्षेत्रिय कार्यालय स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.2/3/-2016-17 अन्वये (सन २०१६-१७ करिता) प्रभाग क्र.२१ मध्ये दळवीनगर भागातील खड्डे ट्रेंचेस हॉटमिक्स पध्दतीने डांबरीकरण करणेकामी मे.एच.सी. कटारीया नि.र.रु.7,92,485/- (अक्षरी र.रु.सात लाख ब्यान्नव हजार चारशे पंच्याअंशी फक्त) पेक्षा -10.10% कमी या ठेकेदाराबरोबर करारनामा करुन कामाचा आदेश देणेत आला असल्याने त्याचे अवलोकन करणे.

विषय क्र.२१) क क्षेत्रिय स्थापत्य विभागाकडे निविदा नोटिस क्र.१/२ २०१६-१७ प्रभाग क्र.६१ दापोडी परीसरातील उर्वरीत रस्ते व टेंचेंस हॅाटमिक्स पध्दतीने डांबरीकरण करणेकामी मे.क्लेन्सी कन्स्ट्रक्शन्स र.रू.७,५०,०००/- (अक्षरी र.रु.सात लाख पन्नास हजार फक्त) या रक्कमेची निविदा मंजुर (-)८.५०% कमी दराने नियमानुसार व निविदेतील अटि शर्ती प्रमाणे भाववाढ कमाल मर्यादा मटेरीयलच्या निर्धारीत केलेल्या बेसीक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये धालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहिल या अटीस अधिन राहुन त्यांचेबरोबर करारनामा करुन घेण्यात असल्याने त्याचे अवलोकन करणे.

विषय क्र.२२) मे.मानस एंटरप्रायजेस, कात्रज पुणे यांचे प्राप्त एकुण दर र.रु.1,86,196/- हे अंदाजपत्रकीय रक्कमेचे तुलनेत 3.74 टक्के ने कमी असुन बाजारभावा नुसार योग्य आहेत. व सार्वत्रिक निवडणूक 2017 करीता तातडीने कामकाज करणे आवश्यक असल्यामुळे मुख्य माहीती व तंत्रज्ञान अधिकारी यांनी दिनांक 08/02/2017 चे प्रस्वान्वये स्विकृत करुन मे मानस एंटरप्रायजेस यांना मातंवि/9/कावि/75/2017 दिनांक 09/02/2017 अन्वये पुरवठा आदेश देण्यात आलेले आहे. त्यानुषंगाने मे मानस एंटरप्रायजेस यांचे कडुन करारनामा न करता आवश्यक संगणक साहीत्य प्राप्त लघुत्तम दर एकुण दर र.रु.1,86,196/- (अक्षरी र.रू. एक लाख शहाऐंशी हजार एकशे एक्याण्णव फक्त) मध्ये खरेदी करुन कामकाज करुन घेतले असल्याने येणा-या खर्चास कार्योत्तर मान्यता देणेबाबत विचार करणे.

विषय क्र.२३) मे. टेक 9 सर्व्हीसेस, चिंचवड यांचे प्राप्त एकुण दर र.रु.1,91,700/- हे अंदाजपत्रकीय रक्कमेचे तुलनेत 1.69 टक्केने कमी असुन बाजारभावा नुसार योग्य आहेत व सार्वत्रिक निवडणूक 2017 करीता तातडीने कामकाज करणे आवश्यक असल्यामुळे मुख्य माहीती व तंत्रज्ञान अधिकारी यांनी दिनांक 06/02/2017 चे प्रस्तावान्वये स्विकृत करुन मे. टेक 9 सर्व्हिसेस यांना मातंवि/9/कावि/60/2017 रोजीचा पुरवठा

आदेश देण्यात आलेले आहे. त्यानुषंगाने मे. टेक 9 सर्व्हिसेस, चिंचवड यांचे कडुन करारनामा न करता 10 MBPS Dedicated Leased Line सुविधा सांगवी, चिखली व भोसरी येथील कार्यालयात प्राप्त लघुत्तम दर एकुण दर र.रु.1,91,700/- (अक्षरी र.रू. एक लाख एक्याण्णव हजार सातशे फक्त) मध्ये कामकाज करुन घेतले असल्याने येणा-या खर्चास कार्योत्तर मान्यता देणेबाबत विचार करणे.

विषय क्र.२४) मनपाच्या झोनिपु स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र. ३/२३-२०१६-१७ मधील अ.क्र.२३ अन्वये प्रभाग क्र.३७ मधील लांडेवाडी झोपडपट्टीमधील अंतर्गत रस्ते हॉटमीक्स पध्दतीने डांबरीकरण करणेकामी मे.श्रीगणेश कंन्स्ट्रक्शन, मोशी नि.र.रु.१७,७३,८०९/- (अक्षरी र.रु.सतरा लाख त्र्याहत्तर हजार आठशे नऊ फक्त) पेक्षा १७% कमी या ठेकेदाराकडून निविदा मजुंर दराने र.रु.१४,७२,२६१/- पर्यंत काम करुन घेणेस बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्यांचेबरोबर कामाचा करारनामा करुन कामाचा आदेश देणेत आला असल्याने त्याचे अवलोकन करणे.

विषय क्र.२५) मनपाचे औद्योगिक प्रशिक्षण केंद्र, कासारवाडी करीता अखिल भारतीय व्यवसाय परिक्षा फेब्रुवारी 2017 प्रथम सत्राच्या बिल ऑफ मटेरियल साहित्य खरेदी करणेकामी कोटेशन नोटीस क्र.37/2016-17 अन्वये, ऑनलाईन कोटेशन दर मागविणेत आले होते त्यामधील लघुत्तम निविदाकार मे. रेखा इंजिनिअरिंग वर्क्स यांचे एकूण 31 बाबींचे दर र.रु.60,505/- (अक्षरी र.रू. साठ हजार पाचशे पाच फक्त) चे दर स्विकृत करण्यात आलेले आहेत. मे.रेखा इंजिनिअरिंग वर्क्स यांचेकडून करारनामा करुन घेणेत आला असून त्यांना पुरवठा आदेश निर्गत करण्यात आलेला असल्याने त्याचे अवलोकन करणे.

विषय क्र.२६) मनपाचे औ.प्र.केंद्र मोरवाडी करीता अखिल भारतीय व्यवसाय परिक्षा फेब्रुवारी/ मार्च 2017 सत्राच्या प्रात्यक्षिक परीक्षेसाठी बिल ऑफ मटेरियल साहित्य खरेदी करणेकामी कोटेशन नोटीस क्र.38/2016-17 अन्वये ऑनलाईन कोटेशन दर मागविणेत आले होते त्यामधील लघुत्तम निविदाकार मे. रेखा इंजिनिअरिंग वर्क्स यांचे एकूण 135 बाबींचे दर र.रु.1,41,635/- (अक्षरी र.रू.एक लाख एक्केचाळीस हजार सहाशे पस्तीस फक्त) चे दर स्विकृत करण्यात आलेले आहेत. मे.रेखा इंजिनिअरिंग वर्क्स यांचेकडून करारनामा करुन घेणेत आला असून त्यांना पुरवठा आदेश निर्गत करण्यात आलेला असल्याने त्याचे अवलोकन करणे.

विषय क्र.२७) पिंपरी चिंचवड महानगरपालिका सार्वत्रिक निवडणुक २०१७ करिता मा.निवडणूक अधिकारी व स्थायी समिती हॉल साठी आवश्यक LED TV Screen साहित्य खरेदीकामी बाब क्र.०१ (Led Tv Screen samsung (size 55”) साहित्य पुरवठा करणेकामी ऑनलाईन कोटेशन नो.क्र.३६/२०१६-१७ अन्वये लघुत्तम निविदाकार मे.झूम कॉम्पुटर्स, पुणे-०४ यांचे आवश्यक एलईडी टिव्ही साहित्य खरेदी करणेकामी एकूण र.रु.१,९९,४००/- (अक्षरी र.रू. एक लाख नव्याण्णव हजार चारशे फक्त) या रकमेचे त्यांचे बरोबर करारनामा करून पुरवठा आदेश निर्गत केला असल्याने त्याचे अवलोकन करणे.

विषय क्र.२८) मनपा सार्वत्रिक निवडणूक २०१७ करीता कॅनन या उत्पादीत कंपनीचे टोनर व डी-लिंक कंपनीचे स्वीच साहित्य खरेदीकामी ऑनलाईन ई.निविदा सु.क्र.७६/२०१६-१७ अन्वये लघुत्तम निविदाकार मे.मोनार्च टेक्नॉलॉजीस (पुणे) प्रा.लि.,पुणे-०४ यांचे टोनर व स्वीच साहित्य खरेदीकामी एकूण र.रु.८,०७,७५९/- (अक्षरी र.रू. आठ लाख सात हजार सातशे एकोणसाठ फक्त) दर स्विकृत करून करारनामा करून पुरवठा आदेश निर्गत केला असल्याने त्याचे अवलोकन करणे.

विषय क्र.२९) मनपा सार्वत्रिक निवडणूक २०१७ चे कामकाजाकरीता मतदार व मतदान केंद्र शोधणेकामी आवश्यक संगणक प्रणाली (सॉप्टवेअर) विकसित करणेकामी ऑनलाईन ई.निविदा सु.क्र.८१/२०१६-१७ अन्वये लघुत्तम निविदाकार मे.मोनार्च टेक्नॉलॉजीस (पुणे) प्रा.लि.यांचेकडून आवश्यक संगणक प्रणाली(सॉप्टवेअर) विकसित करणेकामी एकूण र.रु.६,४८,०००/- (अक्षरी र.रू. सहा लाख अठ्ठेचाळीस हजार फक्त) दर स्विकृत करुन करारनामा करुन पुरवठा आदेश निर्गत केलेला असल्याने त्याचे अवलोकन करणे.

विषय क्र.३०) मनपा सार्वत्रिक निवडणुक २०१७ चे निवडणुक कामकाजाकरीता नेमणुक केलेल्या अधिकारी व कर्मचारी यांचेकरीता चहा, नाष्टा व भोजन पुरविणेकामी ई.निविदा सुचना क्रमांक.५९/२०१६-१७ अन्वये मे.साई सेवा केटरर्स यांचे चहा, नाष्टा व भोजन यांचे लघुत्तम दर एकूण र.रू.३९,२१,९७६/- प्राप्त झालेले आहेत. परंतु मे.साई सेवा केटरर्स यांची दुस-या एका प्रकरणात चौकशी चालू असल्याने त्यांना सदरचे काम न देता व्दितीय लघुत्तम निविदाकार मे.शिवसमर्थ एंटरप्रायजेस हे एल-१ चे दरात काम करणेस तयार असल्याने त्यांना सदरचे काम देणेत आलेले आहे. तरी मे. शिवसमर्थ एंटरप्रायजेस यांचेकडून चहा, नाष्टा व भोजन पुरविणेकामी एकूण र.रू.३९,२१,९७६/- (अक्षरी र.रू. एकोणचाळीस लाख एकवीस हजार नऊशे शहात्तर फक्त) इतका खर्च येणार आहे. प्राप्त लघुत्तम दर हे मनपा अंदाजपत्रकीय दर र.रू.३९,४५,९८०/- पेक्षा ०.६०% ने कमी आहेत. उपरोक्त कामकाज सार्वत्रिक निवडणुक २०१७ करीता तातडीचे असल्याने सदरचे दर स्विकृत करून त्यांचेबरोबर

करारनामा करून पुरवठा आदेश निर्गत करणेत आले असल्याने सदरचे खर्चास कार्योत्तर मान्यता देणेबाबत विचार करणे.

**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी - ४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी - ४११ ०१८ नगरसचिव कार्यालय,
क्रमांक - नस/०३/कावि/६४१/२०१७
दिनांक - ०३/०३/२०१७

टिप - प्रस्तुत कार्यपत्रिकेवरील विषयांची विषयपत्रे (डॉकेटस) नगरसचिव कार्यालयात वाचणेसाठी ठेवणेत आलेली आहेत.